हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रशासन सज्ज
>>पान 2

सरोवराच्या पाण्याच्या पातळीतील लक्षणीय वाढ; ऐतिहासिक मंदिरे पाण्याखाली गेली
>>पान 3

सततच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे पीके धोक्यात भुमराळ्यात अतिवृष्टी : शेतकरी वर्ग हतबल
>>पान 4

**सुविचार**
नेहमी आभार मानायला विसरू नका.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 08 ■ रविवार, दि. 27 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



अल्टवर बंदी घातल्यानंतर एकता कपूरनं लेखी निवेदन केलं जारी

आतील पान

## जन्म प्रमाणपत्र घोटाळा रद्द केलेली ४२ हजार जन्म प्रमाणपत्र १५ ऑगस्टपर्यंत परत मागवा

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे तहसीलदारांना आदेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात उघडकीस आलेल्या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याची गंभीर दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला मोठा आदेश दिला आहे. सरकारने आतापर्यंत रद्द केलेली ४२ हजार १८९ जन्म प्रमाणपत्रे परत मागवण्याचे निर्देश त्यांनी सर्व तहसीलदारांना दिले असून, येत्या १५ ऑगस्टपर्यंत ही प्रमाणपत्रे ताब्यात घ्या असा स्पष्ट अल्टिमेटम त्यांनी दिला आहे.महाराष्ट्रात आणि देशात गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेशी आणि रोहिंग्याच्या रहिवाशी असल्याचा मुद्दा चर्चेत असून घुसकोरी करुन हे भारतात राहत आहेत. त्यात, विशेषत: मुंबईत अनेक ठिकाणी पोलिसांच्या कारवाई बांगलादेशी



नागरिकांना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये, काही महिला असून या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देखील मिळाल्याचे वृत्त माध्यमांत झळकले होते. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून फसव्या पद्धतीने बनवलेली जन्म प्रमाणपत्रे शासनाच्या निदर्शनास आली आहेत. यावर कारवाई करताना सरकारने या सर्व बनावट वा अनधिकृतरीत्या तयार झालेल्या ४२१८९ प्रमाणपत्रांची रद्दीकरण प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र त्यापैकी केवळ ११०५३ प्रमाणपत्रेच शासनाने प्रत्यक्षात परत मिळवली आहेत अशी माहिती समोर आली आहे.

यामुळे आता उर्वरित ३११३६ जन्म प्रमाणपत्रे ताब्यात घेण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर उभं राहिलं आहे. ही सर्व प्रमाणपत्रे जिल्हा प्रशासन, तहसील कार्यालय आणि ग्रामपंचायतींकडून मागवून ती शासनाच्या ताब्यात देण्यात यावीत, असे निर्देश महसूल विभागाकडून देण्यात आले आहेत. या संदर्भात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आणि तहसीलदारांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, ही कारवाई १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण झाली पाहिजे.

या प्रकरणाचा १६ ऑगस्ट रोजी आढावा घेण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे स्वत: उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत. त्यामुळे स्थानिक प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला आहे. संबंधित जिल्हा प्रशासनांनी या मुद्द्यावर तात्काळ लक्ष देत रद्द करण्यात आलेली सर्व प्रमाणपत्रे गोळा करून ती शासनाकडे सुपूर्द करावीत, अशी अधिकृत सूचना आहे. या घोटाळ्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी शासनाने घेतलेल्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, त्याचा दुरुपयोग नागरिकत्व, शिक्षण, आरक्षण व नोकरी मिळवण्यासाठी झाल्याची शक्यता प्रशासन व्यक्त करत आहे. त्यामुळे याप्रकरणी सरकार अत्यंत गंभीर आहे आणि दोषींवर कठोर कारवाई होण्याचे संकेत दिले जात आहेत.

## राज्यातील मंत्र्यांचे फोन टॅप; रोहित पवारांचा दावा

### अजित पवार म्हणाले, पुरावे द्या

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पुन्हा एकदा फोन टॅपिंगचं प्रकरण चर्चेत आलंय. आता तर चक्क राज्यातील मंत्र्यांचेच फोन टॅप होत असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केलाय. आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र सरकारवर निशाणा साधलाय आणि दावा केला आहे की, महाराष्ट्र सरकारच्या काही मंत्र्यांनी त्यांचे फोन टॅप केले जात आहेत या भीतीनं फोन बंद केले आहेत.

अजित पवारांचं प्रत्युत्तर : रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिलंय. ''आरोप करण्याचा अधिकार सर्वांना आहे. पण, अशा आरोपांना पुष्टी देणारे पुरावेही त्यांनी द्यावेत. महाराष्ट्र सरकारच्या मंत्र्यांवर ते हे आरोप कोणत्या आधारावर करत आहेत?'' असा सवाल करत अजित पवार यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत.

रोहित पवारांचा दावा : रोहित पवार यांनी शुक्रवारी त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक पोस्ट शेअर करून महाराष्ट्र सरकारवर निशाणा साधला. त्यांनी लिहिलं की, ''काही मंत्र्यांचे फोन नंबर उपलब्ध नाहीत. टॅपिंगच्या भीतीने त्यांनी त्यांचे फोन बंद केले आहेत.'' काही मंत्र्यांना काढून टाकून मंत्रिमंडळात फेरबदल केला जाऊ शकतो, असा दावा शिवसेना यूबीटीने काही दिवसांपूर्वी केला होता. त्यानंतर लगेच रोहित पवार यांनी फोन टॅपिंगचा दावा केलाय.

## मुंबई एअरपोर्टला धमकीचे ३ कॉल; सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले!

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर बॉम्ब ठेवण्यात आला आहे आणि थोड्याच वेळात मोठा स्फोट होणार असा धमकीचा फोन आला आहे. शुक्रवारी मुंबई पोलिस नियंत्रण कक्षाला एकामागोमाग ३ वेगवेगळ्या क्रमांकांवरून धमकीचे फोन आले, ज्यामुळे सगळी खळबळ उडाली. या कॉलनंतर, मुंबई पोलिसांचे पथक तातडीने सतर्क झाले आणि पोलिस अधिकारी, तसेच बॉम्ब शोध पथकाने विमानतळ गाठले. प्रत्येक तास सखोल शोध घेऊन मोहीम राबवण्यात आली, मात्र एअरपोर्टवर कुठेही, काहीच संशयास्पद आढळून आलेले नाही.

पोलिस अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई विमानतळाच्या टर्मिनल २ वर एका अज्ञात व्यक्तीने बॉम्बस्फोटाची धमकी दिली होती. माहिती मिळताच मुंबई पोलिसांचे उच्च अधिकारी आणि बॉम्ब निकामी पथक घटनास्थळी दाखल झाले. एअरपोर्टचा संपूर्ण परिसर खाली करण्यात आला. त्यानंतर प्रत्येक कोपऱ्याची, सखोल, बारकाईने तपासणी करण्यात आली. मात्र पोलिस व बॉम्बशोधक पथकाला कुठेच, काहीही संशयास्पद आढळलं नाही. त्यामुळे बॉम्बची ही केवळ अफवा असल्याचं दिसून आलं.

प्राथमिक तपासामध्ये असं दिसून आलंय की, हे धमकीचे कॉल आसाम आणि पश्चिम बंगाल सीमेजवळ सक्रिय असलेल्या मोबाईल नंबरचा वापर करून केले गेले होते.

## राज्यासह विदर्भात पावसाचा कहर!

### मुसळधार पावसामुळे अनेक मार्ग बंद, जनजीवन विस्कळीत; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यासह विदर्भात देखील आज दमदार पावसाने हजेरी लावली असून पहाटेपासून कोसळत असलेल्या पावसाने अनेक जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशातच आज (२६ जुलै) पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात तुफान पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. नागपूर वेधशाळेने वर्तवलेल्या अंदाजानुसार अनेक जिल्ह्यांना पावसाने अक्षरक्ष: झोडपून काढले आहे. मुसळधार पावसामुळे गोंदिया जिल्ह्यातील २७ मार्ग वाहतुकीसाठी बंद झाले आहे. तर देवरी तालुक्यातील १०, मोरगाव अर्जुनी तालुक्यातील ७, आमगाव तालुक्यातील ४ तर गोरेगाव, तिरोडा तालुक्यातील ६ मार्ग वाहतुकीसाठी बंद झाल्याची माहिती समोर आली आहे.

गोंदिया जिल्ह्यात सतत मुसळधार पाऊस बरसत असल्याने अनेक भागातील नदी, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. तर गोंदिया जिल्ह्यातील अनेक मार्ग वाहतुकीसाठी बंद ही झाले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील एकूण २७ मार्ग वाहतुकीसाठी बंद झाली असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा उपयोग करावे व जिथे पूर असेल तेथून आवागमन करू नये, असे आवाहन गोंदिया जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

दुसरीकडे, भंडाऱ्यात कालपासून सुरू असलेल्या पावसामुळं नदीनाले ओसंडून वाहू लागले आहेत. अशात जिल्हा अंतर्गत मार्गावरील गावांना जोडणाऱ्या आठ गावांच्या मार्गावर पाणी असल्यानं हे मार्ग वाहतुकीसाठी जिल्हा प्रशासनानं बंद केले आहे. भंडारा शहराजवळील वैनगंगा नदीवरून कारधा गावाकडं जाणाऱ्या लहान पुलावरून वाहतूक बंद करण्यात आली असून खमारी नाल्यावरून पाणी असल्यानं तो मार्गही बंद झाला आहे. यासोबतचं साकोली तालुक्यातील विर्शी ते उकारा, चिंगी ते खोबा, गिरोला ते बोंडे, सराटी ते चीचगाव, नेहारवानी ते कटनधरा, लाखनी तालुक्यातील मिरेगाव ते सोनमाळा हे आठ मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहे.

## इडा पीडा टळो आणि मंत्रिपद वाचो!, माणिकराव कोकाटे थेट शनिदेवाच्या चरणी लीन

दैनिक आपला विदर्भ



**नंदुरबार/प्रतिनिधी :** राजकारणात सत्तेच्या खुर्चीवर टिकायचं असेल, तर फक्त खेळी नाहीष्तर नशीबही लागत, असं राजकीय अभ्यासकांचं मत आहे. अशातच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे काही दिवसांपासून जोरदार चर्चेत आहे. गेल्या अनेक दिवसापासून सुरू असलेली विरोधकांच्या आरोपांच्या साडेसातीपासून मुक्ती मिळावी म्हणून मंत्री कोकाटे यांनी शनिदेवाच्या चरणी धाव घेतली आहे. राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री माणिकराव कोकाटे नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. देशातील एकमेव शनि देवाचे साडेसाती मुक्त स्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या शनिमांडळ येथील शनी मंदिरात कोकाटे दर्शन घेऊन पूजा अर्चा केली असल्याचं समोर आलंय.

माणिकराव कोकाटे शनी मंदिरात जाऊन शनि देवाची विधिवत पूजा करत विरोधकांच्या साडेसातीतून मुक्ती मिळावी म्हणून या साडेसाती मुक्ती ठिकाणाला भेट देत आहेत. शनिवारी शनि देवाची साडेसाती मुक्ती ठिकाणी पूजा केल्याने मागे लागलेली इडा पिडा दूर होत असल्याची भाविकांची भावना आहे. शेतकऱ्याबाबत केलेलं वक्तव्य किंवा विधीमंडळात रमी खेळतानाचा त्यांचा व्हायरल व्हिडीओ असेल, यामुळे ते विरोधकांच्या भोवऱ्यात अडकले आले आहेत. त्यांच्यावर आरोपांची राळ उडवली जात आहे, तर त्यांचा राजीनामा घेतला जाण्याची दाट शक्यता देखील वर्तवली जात आहे. कारण मंगळवारी त्या संदर्भात महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या सर्व घडामोडी घडत असतानाच आपल्या मागची इडा पिडा टळावी यासाठी राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आता शनिदेवाला साकडं घातलं आहे, त्याचबरोबर शनी मंदिरात कोकाटे दर्शन घेऊन पूजा अर्चा करणार असल्याचं समोर आलं आहे. लवकरच कोकाटेंच्या राजीनाम्याबाबतचं चित्र स्पष्ट होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## नदीत अडकलेल्या चौघांना गावकऱ्यांनी वाचवले

मेहकर तालुक्यातील घटना

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** नदीला अचानक आलेल्या पाण्याच्या लोंढ्यामुळे अडकलेल्या चार शेतकऱ्यांना गावकऱ्यांच्या प्रसंगावधानामुळे जीवनदान मिळाले आहे. सदर घटना तालुक्यातील अंजनी येथे घडली.

प्राप्त माहितीनुसार, दूरवर नदी क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांना पाण्याचा अंदाज आला होता. त्यामुळे शेतातली कामे लवकर आटोपून ते ट्रॅक्टरने वेगाने घराकडे परत जात होते.मात्र, गावाकडे जाण्याचा रस्ता नदीपात्रातून असल्याने त्यांना अडचणीचा सामना करावा लागला. जसा ट्रॅक्टर नदीपात्रात उतरवला,



तसा अचानक पाण्याचा मोठा लोंढा आला आणि ट्रॅक्टरसह सर्वजण पुरात अडकले. यापैकी एका व्यक्तीने प्रसंगावधान दाखवत तातडीने गावात फोन करून मदतीची याचना केली. घटनेची माहिती मिळताच गावातील काही लोक तात्काळ धावून आले आणि त्यांनी अडकलेल्या अंजनी येथील दोन महिलांसह दोन पुरुषांना यशस्वीरित्या रेस्क्यू करत त्यांचे प्राण वाचवले. गावकऱ्यांच्या या धाडसी कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## देशभरातील १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार

### सुळे, बारणे, सावंत, म्हस्के, स्मिता वाघ, वर्षा गायकवाड आणि मेधा कुलकर्णी यांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील १७ खासदारांना यंदाचा 'संसदरत्न पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. यंदा 'संसदरत्न' पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली असून महाराष्ट्रातील ७ खासदारांनी या यादीत स्थान पटकावले आहे. संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करणार्या खासदारांना दरवर्षी 'प्राईम पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. या संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्राने यंदाहि बाजी मारली आहे.

यात सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे यांच्यासह भर्तूहरी महताब आणि एन के प्रेमचंद्रन यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. यासह अरविंद सावंत, नरेश म्हस्के, स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी, वर्षा गायकवाड यांनाहि संसदरत्न पुरस्काराने



गौरविण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील खा. स्मिता वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गट), श्रीरंग बारणे (शिवसेना), नरेश म्हस्के (शिवसेना), अरविंद सावंत (शिवसेना- उबाठा)आणि वर्षा गायकवाड (काँग्रेस) या सात खासदारांचा संसदेत उत्कृष्ट कामगिरीसाठी 'संसदरत्न' पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयाच्या आकडेवारीवरून प्राइम पॉइंट फाउंडेशन या संस्थेकडून हे पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार, २०१० मध्ये प्राइम पॉइंट फाउंडेशन आणि ई-मॅगझिन प्रेसेन्स यांनी संसद रत्न पुरस्कारांची स्थापना केली. मे २०१० मध्ये चेन्नई येथे झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. उल्लेखनीय म्हणजे, श्री हंसराज गंगाराम अहिर हे या पुरस्काराचे पहिले प्राप्तकर्ता होते.

नागरी समाजाच्या वतीने हे पुरस्कार प्रदान केले जातात. २०२४ पर्यंत, १४ पुरस्कार समारंभांमध्ये १२५ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक संसद सदस्य आणि संसदीय स्थायी समित्यांचा समावेश आहे. प्रतिष्ठित पुरस्कार विजेते संसद सदस्य आणि नागरी समाजाचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली ज्युरी समिती कामगिरीच्या डेटाच्या आधारे पुरस्कार विजेत्यांची नामांकने करते. हा डेटा लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांच्या अधिकृत नोंदी तसेच पीआरएस कायदेविषयक संशोधनातून मिळवला जातो. कामगिरी निर्देशकांमध्ये सुरू झालेल्या वादविवादांची संख्या, खाजगी सदस्यांची विधेयके सादर करण्यात आली आणि उपस्थित केलेले प्रश्न यांचा समावेश आहे.

## डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज दहावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्र्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्र्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणण्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही ( सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल ) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अर्जुन हा एम. बी. टी ( मेन बॅटल टँक ) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट ( एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्र्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथी निमित्ताने विनम्र अभिवादन!

# हुमणी अळी नियंत्रणासाठी प्रशासन सज्ज

## शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन पालकमंत्री मकरंद पाटील यांची ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**बुलढाणा जिल्ह्यातील सोयाबीन व मका पिकांवर हुमणी अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आले असले तरी, या संकटावर मात करण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिली आहे.

प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात ३१३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, कृषी विभाग व जिल्हा प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत. बाधित क्षेत्रातील पंचनामे जलदगतीने सुरू असून, शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळवून दिली जाईल, असेही पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे, शास्त्रज्ञ व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती मोहीम



राबवण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी २४ जुलै रोजी प्रसारित केलेल्या तांत्रिक बुलेटिननुसार, अळीच्या जीवनचक्रावर आधारित एकात्मिक व्यवस्थापनाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक मनोज ढगे यांनी केले आहे.

**हुमणी अळी नियंत्रणासाठी उपाययोजना**

हुमणी अळी ओळखणे: हुमणी अळी इंग्रजी C अक्षराच्या आकाराची असून, पूर्ण वाढ झाल्यावर ती तीन ते पाच सेंटीमीटर रुंद आणि पांढुरक्या रंगाची असते. ही अळी सोयाबीन, कपाशी, तूर, ज्वारी, मूग, ऊस, सूर्यफूल, मिरची आणि वांगी यांसारख्या पिकांच्या मुळांवर उपजीविका करते. यामुळे पिके कमकुवत होऊन जमिनीवर कोलमडतात. पिकांमध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी, बाधित झाडांची पाने पिवळी पडून सुकतात.

**सौम्य प्रादुर्भावासाठी जैविक नियंत्रण**

जर शेतात हुमणी अळीचा सौम्य किंवा तुरळक प्रादुर्भाव आढळल्यास, मेटारायझियम () या जैविक कीटकनाशकाचा वापर करावा. ४० मिली मेटारायझियम १० लिटर पाण्यात मिसळून पिकांच्या मुळाजवळ टाकावे. तसेच, १ किलो मेटारायझियम भुकटी १०० किलो शेणखतात मिसळून प्रति हेक्टर शेतात फेकावी. हे जैविक कीटकनाशक वापरताना शेतात पुरेशी ओल असल्याची खात्री करावी.

**तीव्र प्रादुर्भावासाठी रासायनिक नियंत्रण**

हुमणी अळीचा तीव्र किंवा लक्षणीय प्रादुर्भाव आढळून आल्यास, स्थानिक तज्ज्ञांच्या सल्ल्याने रासायनिक कीटकनाशकांचा सुरक्षित वापर करावा. Fipronil ४०% + Imidacloprid ४०% या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचे ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात द्रावण तयार करून झाडाच्या खोडाजवळ टाकावे. Thiamethoxam 0.9% + Fipronil 2% या मिश्र दाणेदार कीटकनाशकाचा १२ ते १५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीत ओलावा असताना झाडाच्या खोडाजवळ वापर करावा.

शेतकऱ्यांनो, रसायनांचा वापर करताना लेबलवरील मार्गदर्शक सूचना व प्रमाणाचे काटेकोर पालन करावे. कोणतेही मिश्रण टाळून, तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपचार करावेत. ''शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत,'' अशी ग्वाही ना.मकरंद पाटील यांनी यावेळी दिली.

## अल्टवर बंदी घातल्यानंतर एकता कपूरनं लेखी निवेदन केलं जारी

**मुंबई/प्रतिनिधी :** २५ जुलै रोजी सरकारनं अश्लीलता पसरवणाऱ्या २५ ॲप्सवर मोठे पाऊल उचलले. या संदर्भात, सध्याच्या सरकारनं या प्लॅटफॉर्मवर बंदी घातली होती, ज्यामध्ये अल्ट चे नाव देखील समाविष्ट आहे. या ॲपचे नाव पूर्वी अल्ट बालाजी होते आणि त्याच्या सह-संस्थापक एकता कपूर आणि तिची आई शोभा कपूर होत्या. अल्ट ॲप एकता कपूरशी जोडले जात आहे. आता बंदीनंतर एकता कपूरनं सोशल मीडियावर एक लेखी निवेदन जारी केलं आहे. तिच्या लेखी निवेदनात तिनं तिचा रागही व्यक्त केला आहे. एकता कपूरनं या प्रकरणापासून स्वतःला वेगळे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे आणि स्पष्टपणे म्हटलं आहे की, तिचा या ॲपशी काहीही संबंध नाही.

निर्माती एकता कपूरनं तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर हे लेखी निवेदन जारी केलं आहे. एकताच्या विधानात असं म्हटलं आहे की,मीडियामध्ये असे वृत्त आहे की, अल्ट वर बंदी घालण्यात आली आहे, मात्र मी तुम्हाला सांगतो की, आमचा या ॲपशी काहीही संबंध नाही, आम्ही जून २०२१ मध्ये या ॲपपासून स्वतःला दूर केले होते, म्हणून मीडियाला विनंती आहे की त्यांनी बातम्या सादर करण्यापूर्वी तथ्ये तपासावीत. ही पोस्ट शेअर करताना एकता कपूरनं त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिलं आहे, ज्यांना याची काळजी आहे त्यांच्यासाठी.

एकता कपूर तिच्या लोकप्रिय टीव्ही मालिका क्यूंकी सास भी कभी बहू थीच्या दुसऱ्या भागामुळं सध्या चर्चेत आहे. स्मृती इराणी या शोमध्ये पुन्हा एकदा दिसणार आहेत.

## धर्म विचारून तरुणाला मारहाण करणाऱ्या विरुद्ध धडक मोर्चा ; सोमवारी खामगाव बंदचा इशारा





**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगावात तू गाय चोर आहे व त्याचा धर्म विचारून एका बौद्ध समाजाच्या तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना खामगाव शहरात घडली आहे याच्या निषेधार्थ बौद्ध समाज बांधव आक्रमक झाला असून उपविभागीय कार्यालयावर धडक मोर्चा काढून या घटनेचा निषेध नोंदविला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे गाय चोर है'' आरोप करत दलीत तरुण रोहन पैठणकर गायकवाड असल्याचे संशयावरून बेदम मारहाण केल्याची घटना दोन दिवसापुर्वी घडली होती. नंतर पीडित तरुणाच्या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलिसांनी तिन्ही आरोपींवर अट्रोसिटीसह, भारतीय न्याय संहितेच्या विविध दखलपात्र कलमानुसार गुन्ह्याची नोंद आहे..परंतु कोणत्याही प्रकारे संबंधित प्रशासनाने गांभिर्य व तत्परता दाखविली नाही.आरोपी आजही मोकाट आहेत. अद्यापपर्यंत अटकेचीकार्यवाही झाली नाही. या तिन्ही सराईत गुन्हेगाराना नेमके कोण पाठीशी घालत आहे हा प्रश्न सर्वसामान्य लोकांना पडला आहे. त्या तिन्ही गुन्हेगारांनी निर्लज्जपणाचा कळस गाठून त्याचा धर्म तपासण्यासाठी तरुणाचे कपडे उतरवून तू कुठल्या धर्माचा आहे अशी सुद्धा विचारणा केली. हे अतिशय गंभीर आहे. या प्रकरणातील तीनही आरोपी युवक हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असुन त्यातील गब्बू गुजरीवाल या आरोपीवरती नुसार कारवाई सुद्धा केली होती व अशाच प्रकारचे अनेक गुन्हे या युवकांवरती खामगाव शहरात विविध पोलीस स्टेशनमध्ये दाखल आहेत. त्यामुळे अशा गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांना जिल्ह्यातून तडीपार करावे व एम.पी.डी.ए.ऍक्टनुसार कारवाई करावी.यामध्ये असलेला मुख्य आरोपी रोहित पगारीया हा दोन धर्मात तेढ निर्माण करणारा व समाजात अशांतता रहावी याकरिता उग्र विधाने करीत असतो. याच्या कथित जातीवादी संघटनेवर देखील बंदी आणून त्याच्या मुसक्या लवकरात लवकर आवळण्यात याव्यात. व आरोपींना कठोर शासन करून पीडित परिवाराला न्याय देण्यात यावा. या मागणीसाठी बौद्ध समाज बांधवांकडून धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला मुस्लिम बांधवांनी सुद्धा पाठिंबा दिला असून निंदनीय घटनेचा जाहीर निषेध नोंदवित सोमवारी

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी घेतले श्री संत गजानन महाराजांचे दर्शन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी आज शनिवारी संत नगरी शेगाव येथे भेट देऊन श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. शुक्रवारी रात्रीपासून ते शेगावात मुक्कामी होते.

दर्शनावेळी समाधी मंदिरातील शांत, भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात ''गण गण गणात बोते'' च्या गजरात मंत्रमुग्ध होत, सहकार मंत्र्यांनी समाधी स्थळावर अपार दिव्यता व ऊर्जा अनुभवली. त्यांनी श्रींच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील सहकार चळवळीच्या बळकटीकरणासाठी प्रार्थना केली.

या वेळी श्री गजानन महाराज संस्थानच्यावतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा, जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण, सहाय्यक निबंधक जी. जे. आमले, तसेच सहकारी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पावसाळ्यात रस्त्यांची दयनीय अवस्था; प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी खड्ड्यातील पाण्यात ''होडी चलाव'' आंदोलन



**बीड/प्रतिनिधी :** बीड शहरातील धानोरा रोडची मागील पंधरा वर्षांपासून दुरावस्था आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक बिकट होते. त्यामुळे या रस्त्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीसह स्थानिक नागरिकांनी खड्ड्यात साचलेल्या पाण्यात होडी चलाव आंदोलन करून लक्ष वेधले आहे. यावेळी खड्ड्यांना लोकप्रतिनिधींचे नाव देऊन सन्मान करण्यात आला. भूसंपादन आणि मावेजाच्या मागणी संदर्भात रस्त्याचे काम रखडले गेले आहे. न्यायालयीन प्रक्रिया देखील याबाबत सुरू आहे. वारंवार स्थानिकांकडून मागणी करून देखील हा रस्ता होत नसल्याने नागरिक संतप्त आहेत. सदरील प्रश्न मार्गी न लागल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## संजय राऊत यांच्या आरोपावर उत्तर द्यायला मी बांधील नाही : खा. श्रीकांत शिंदे

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** संजय राऊत कोण? मी कोणत्या संजय राऊतला ओळखत नाही. संजय राऊत रोज उठून कुठलाही पुरावा न देता आरोप करून शिव्या शाप देतात. याची तुम्ही देखील बाजू तपासली पाहिजे. संजय राऊत यांच्या आरोपावर उत्तर द्यायला मी काही बांधील नाही. पुरावे असतील तर समोर बसून दाखवले पाहिजेत. कुणी कुणावर आरोप करत असेल तर ते पुराव्यानिशी केले पाहिजेत. कोण प्रश्न विचारत आहे त्याला मी ओळखत नाही असे म्हणत संजय राऊतांवर खासदार श्रीकांत शिंदे यांनी टिका केली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, शिवसेनेचा, बाळासाहेबांचा विचार घेऊन शिवसैनिक पुढे चाललेले आहेत. त्यामुळेच भर पावसात जिल्हा कार्यालय उद्घाटनाला शिवसैनिकांची गर्दी आहे. महाराष्ट्रात इतकं मोठं यश कधीच मिळाले नाही तेवढं महायुतीला मिळाले आहे. मुख्यमंत्री असताना जे काम अडीच वर्ष एकनाथ शिंदे यांनी केले, तरुण, महिला, गरजू यांच्यासाठी काम केले. कोणी विचारही केला नव्हते असे यश मिळाले, कोल्हापुरात १०० पैकी १० आमदार निवडून आले. पन्हाळा पावनखिंड मोहिमेला गेल्या वर्षी आलो होतो. तेव्हा ७०-७२ वर्षांचे गृहस्थ होते. ते आमच्या परतीच्या मार्गावर पावसात आमची वाट बघत २ तास थांबले होते. ते मला भेटले तेव्हा बोलले, एकनाथ शिंदे यांनी आमच्यासाठी आणलेल्या योजनेबद्दल



त्यांना धन्यवाद सांगा.

ते म्हणाले, मोफत बस प्रवास योजनेमुळे मी कोणावर अवलंबून राहत नाही. त्यामुळे शिंदे साहेबांचे आभार मानायला ते थांबले होते. एकनाथ शिंदे कॉमन आहे.म्हणून आधी सगळीकडे सांगत होते. आता ते डेडिकेटेड टू कॉमन मॅन आहे म्हणून सांगतात. जो-जो आला त्या प्रत्येकाला मुख्यमंत्री काय देऊ शकतो, याचा विचार त्यांनी केला. म्हणून अडीच वर्षात शिंदे साहेबांवर लोकांचा विश्वास बसला आहे.

लोकसभा निवडणुकीवेळी माझा प्रचार सोडून माझ्या मित्राच्या प्रचारासाठी मी आलो होतो. आपला आमदार, खासदार निवडून येण्यासाठी प्रयत्न करणारे नेते म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. आजही विरोधक शिव्याशाप द्यायचे काम करत आहेत. मात्र, शिंदेंनी कामातून उत्तर दिले आहे.

आजही वेगवेगळ्या पक्षाचे लोक एकनाथ शिंदेंवर विश्वास ठेवून पक्षात येताहेत. जे वचन दिले ते पूर्ण केले आहे. आपली सगळ्यांची जबाबदारी असेल की, जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या आणि नगरपालिका, महापालिका निवडणुकीत शिवसेनेची सत्ता असेल असा प्रयत्न करायचा आहे.३२०० कोटी पूर रोखण्यासाठी, रंकाळ्यासाठी, रस्त्यांसाठी, शाहू समाधी स्थळासाठी निधी आणि आयटी पार्कचा पाठपुरावा एकनाथ शिंदेंनी केला आहे. येणाऱ्या काळात अपेक्षित कामे आपण नक्की करू, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील यश मिळेल, असा विश्वास खासदार श्रीकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### अंबादास दानवे यांनी केलेल्या दाव्यावर धनंजय देशमुख यांची प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** विरोधी पक्षनेते राहिलेले अंबादास दानवे यांनी जे विधान केलं त्यांच्याकडे त्याबाबत काही पुरावे असतील ते खोटे बोलण्याचा काही विषय नाही. त्यांच्यासमोर फोन आला. मात्र, तो नेमका कुणाचा? त्याची कॉल डिटेल्स जेल प्रशासनाने तपासून बाहेर कोण सूचना देत होते? वाल्मिक कराडचे जे बॅनर लावत आहेत ते अजित पवारांचे पदाधिकारी असल्याचे पुरावे अजित पवारांकडे देखील दिल्याचे धनंजय देशमुख यांनी म्हंटले. मात्र, त्यावर कोणतीही दखल घेतली नाही. आरोपी फोन वापरत असेल तर त्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे.

### वाल्मिक लोकांना जेलमधून फोन करतो हा राज्यातला शॉकिंग विषय - मनोज जरांगे पाटील



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** वाल्मिक जेलमधून फोनवर बोलतो की नाही? याची सखोल चौकशी करा, अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा मनोज जरांगे यांनी फडणवीस आणि अजित पवारांना दिलाय. वाल्मिक कराड जेलमधून फोन करत असेल तर त्याला त्या जेलमधून बदलून हे प्रकरण तातडीने फाशीच्या शिक्षेच्या सुनावणीकडे जाऊ द्या, अशी मागणीही जरांगे यांनी केलीय. वाल्मिक लोकांना जेलमधून फोन करतो, हा राज्यातला शॉकिंग विषय आहे. वाल्मिक कराड हा दहशतवाद्यांपेक्षाही घातक असल्याचे सांगत वाल्मिकने जेलमधून फोन केल्यास पुन्हा मर्डर पडतील याला फडणवीस जबाबदार असतील, असा इशारा देखील जरांगे यांनी फडणवीस आणि अजित पवारांना दिलाय. वाल्मिकच्या मालकाला मंत्रिपद देऊन बीड जिल्ह्याला रक्तपाताकडे न्यायचं आहे का? असा सवाल देखील त्यांनी केला आहे.

### नाशिकमध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा एकत्र बॅनर




**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिक मध्ये लावण्यात आलेल्या बॅनरवर राज ठाकरे यांचा फोटो लावण्यात आला आहे. नाशिकच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून शहरात उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी लावण्यात आलेल्या बॅनर वर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचा फोटो लावण्यात आल्याने पुन्हा एकदा दोन्ही भाऊ एकत्र येणार असल्याची चर्चा सध्या सुरू झाली आहे.

### पुणे विमानतळावरुन १०.५ कोटी किमतीचे अंमली पदार्थ जप्त

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात मध्यंतरी अंमली पदार्थांची मोठी कारवाई पुणे पोलिसांकडून करण्यात आली होती. ज्यात हजारो किलो अंमली पदार्थ पोलिसांकडून जप्त करण्यात आले होते. असं असताना आता पुणे विमानतळावर कस्टम विभागाच्या वतीने मोठी कारवाई करीत एका प्रवाशाकडून १०.४७ किलोग्रॅम हायड्रोपोनिक मारिजुआना जप्त करण्यात आले असून, ज्याची किंमत अंदाजे १०.५ कोटी रुपये इतकी आहे. अंमली पदार्थाच्या प्रकरणात कस्टम विभागाकडून अभिनय अमरनाथ यादव या प्रवाशाला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २४ जुलै रोजी पुणे विमानतळावर इंडिगो फ्लाइट क्रमांक ६ए-१०९६ ने तो बँकॉकहून उतरला असता. खरं तर अटकेत असलेल्या प्रवाशाची वागणूक ही संशयास्पद असल्याच्या कारणाने कस्टम अधिकाऱ्यांनी त्याची तपासणी केली असता, त्यांना त्याच्याजवळ १०.४७ किलोग्रॅम हायड्रोपोनिक वीड आढळून आलीज्याची किंमत अंदाजे १०.५ कोटी रुपये आहे.

# सरोवराच्या पाण्याच्या पातळीतील लक्षणीय वाढ; ऐतिहासिक मंदिरे पाण्याखाली गेली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** जगविख्यात असलेल्या लोणार सरोवराच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली असून सरोवराच्या परिसरात असलेल्या एतिहासिक मंदिरे पाण्याखाली गेली आहेत.लोणार सरोवराच्या पाणीपातळीत जवळपास चार फ ूट पाण्याची पातळी वाढली आहे. अशा प्रकारची लक्षणीय वाढ तब्बल दशकभरानंतर प्रथमच झाली असल्याचे बोलले जात आहे.

लोणार येथील जागतिक सरोवर हे उल्कापातामुळे निर्माण झालेले आणि आशिया खंडातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे.यावऱ्षी सतत सुरू असलेल्या पावसामुळे सरोवराच्या पाणी पातळीत वाढ झाली असल्याचे बोलले जात असून सरोवर परिसरातील नैसर्गिक झरे पुन्हा प्रवाहित झाले आहेत. मात्र, तर, परिसरातील सांडपाणी आणि दूषित पाण्याचे मिश्रण थेट सरोवरात जात असल्याने सरोवराच्या पाण्याचा रंग बदलू लागला असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. याचा थेट परिणाम सरोवराच्या नैसर्गिक अल्कधर्मी संरचनेवर आणि त्यामध्ये आढळणाऱ्या दुर्मिळ जैवविविधतेवर होत आहे.

लोणार सरोवर हे केवळ भौगोलिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर जैविक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही अत्यंत मौल्यवान आहे. सरोवराच्या पाण्याच्या पातळीतील लक्षणीय वाढीमुळे काठावर असलेली ऐतिहासिक मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. त्यामध्ये बगीच्या महादेव मंदिर, अंबरखाना महादेव मंदिर आणि कमळजा मातेचे मंदिर यांचा समावेश आहे. या पाणीपातळीच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक नागरिक, अभ्यासक आणि पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे तातडीने सांडपाणी व्यवस्थापनासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

लोणार सरोवर सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त पाणथळ क्षेत्र आहे. ही मान्यता सरोवराच्या पर्यावरणीय आणि जैवविविधतेच्या वैशिष्ट्यांमुळे मिळालेली आहे. तर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळावा, यासाठी महाराष्ट्र सरकार आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण संयुक्तरित्या प्रस्ताव तयार करत आहेत.

सदर प्रस्ताव अमरावती विभागीय आयुक्त निधी पांडे आणि बुलढाणा जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या देखरेखीखाली अंतिम टप्प्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. कोट्यवधीचा खऱ्च मात्र, सांडपाण्याची समस्या कायम लोणार सरोवराच्या संवर्धनासाठी न्यायालयाने हस्तक्षेप केला होता. त्यानंतर लोणार नगर परिषद प्रशासनाच्या वतीने सांडपाणी थांबवण्यासाठी समिती नेमली होती. तसेच, राज्य सरकारने सरोवराच्या संवर्धनासाठी ९१.२९ कोटी रुपये आणि ३७० कोटी रुपयांचा निधीचा विकास आराखडे मंजूर केले असून, युनेस्को मानांकनासाठीही प्रयत्न सुरू आहेत. मात्र, तरीही सांडपाण्याचा प्रश्न कायम आहे. आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचा निधी खऱ्च केल्यानंतरही येथील विकासाचा कायम असल्याने प्रशासना प्रति पर्यटन प्रेमीमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

### जागतिक पर्यटनस्थळाला विकासाची प्रतीक्षा

लोणार हे जागतिक दर्जाचे सरोवर व पर्यटनस्थळ आहे. मात्र, येथील विकासाला अपेक्षीत चालना मिळाली नाही. युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ म्हणून मानांकन मिळाल्यास लोणार सरोवराच्या पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.तसेच जागतिक दर्जाच्या नामांकन प्राप्त झाल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर या सरोवराचे महत्त्व वाढणार आहे. जागतिक पर्यटक, अभ्यासक, संशोधक यांचे आकर्षण या स्थळाकडे वाढेल, अशी भूमिका अभ्यासकांनी मांडली आहे. जागतिक स्तरावरील सरोवर असतानाही या ठिकाणचा अपेक्षीत विकास न झाल्याने याकडे पर्यटक पाठ फिरवीत असल्याचे दिसून येत आहे.



## ज्ञानेश्वर इरतकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस मेहकर तालुका कार्याध्यक्षपदी निवड

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मेहकर तालुका कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बुलढाणा जिल्हाध्यक्ष सौ. रेखाताई खेडेकर यांनी पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार व प्रदेशाध्यक्ष यांच्या आदेशान्वये मेहकर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेतृत्व ज्ञानेश्वर इरतकर यांची निवड केली आहे.

त्यांना २५ जुलै रोजी नियुक्तपत्र देण्यात आले आहे. त्यांच्या निवडीने आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद तथा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बाजू ज्ञानेश्वर इरतकर यांच्या नियुक्तीने मजबूत झाली आहे. ज्ञानेश्वर इरतकर यांचे मेहकर तालुक्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष सौ. रेखाताई खेडेकर यांनी त्यांच्यावर मेहकर तालुका कार्याध्यक्ष ची जबाबदारी देत मश निवड केली आहे. नियुक्तीपत्रात पक्ष बळकट करण्यासाठी तसेच पक्षाचे ध्येय धोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचून सर्व सामान्यांना न्याय देण्या यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे

तर निवडी संदर्भात बोलताना ज्ञानेश्वर इरतकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला जाऊ न देता पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचवून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे निवडी संदर्भात बोलताना ज्ञानेश्वर इरतकर यांनी सांगितले...




## कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस: 'राधानगरी'चे चार स्वयंचलित दरवाजे खुले, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** धरण क्षेत्रात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे राधानगरी धरण पूर्ण क्षमतेनं भरलं असून धरणाचे ४ स्वयंचलित दरवाजे खुले करण्यात आले आहेत. स्वयंचलित दरवाजातून ५ हजार २१२ क्यूसेक पाण्याचा विसर्ग सध्या भोगावती नदीपात्रात सुरू आहे. यामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत प्रचंड वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा प्रशासनकडून देण्यात आला आहे. गेल्या चार दिवसांपासून राधानगरी, गगनबावडा, भुदरगड पन्हाळा, आजरा या तालुक्यांमध्ये दमदार पाऊस सुरू आहे. मागील आठ तासात राधानगरी धरण क्षेत्रात ३७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली करण्यात आली आहे. मध्यरात्री धरणाचे स्वयंचलित दरवाजे खुले झाले. धरणाच्या ३,४, ५ आणि ६ या स्वयंचलित दरवाज्यामधून ५ हजार ७१२ आणि पावर हाऊसमधून १५०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग भोगावती नदीपत्रात सुरू आहे.

## देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह निमित्त बांधकाम मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे चंद्रपूरात



दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहाच्या निमित्ताने राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले हे आज चंद्रपूर दौऱ्यावर आले. आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आयोजित सप्ताहातील विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सहभाग घेतला.मंत्री भोसले यांनी राज्यातील सर्वात मोठ्या प्राचीन शिवलिंगाजवळ जलाभिषेक व रुद्राभिषेक करून दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी माता महाकाली मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले.शिवाजी चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवनावर आधारित प्रदर्शनीचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते पार पडले.

या वेळी बोलताना मंत्री भोसले म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मी चंद्रपूरला आलो असून सलग चार-पाच दिवस विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या ठिकाणी माता महाकाली देवीचे दर्शन घेतल्याचा इतिहास आहे आणि त्यांच्या वंशज म्हणून मीही येथे आलो आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून जे सहकार्य हवे, ते नक्की करीन

## बेलापूरमध्ये गुगल मॅपच्या नादात कार पडली खाडीत; पोलिसांच्या सतर्कतेमुळे महिलेला मिळाले जीवदान

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** तंत्रज्ञान प्रचंड प्रगत झालेले असून, गुगल मॅपच्या आधारे अनेक आपला रस्ता शोधत असतात. मात्र आता गुगल मॅपच्या आधारे उलवे येथे जाणारी सुसाट कार थेट खाडीत पडल्याची घटना शुक्रवारी बेलापूरमध्ये घडली. घटनेच्या वेळी तिथे उपस्थित असलेल्या सागरी सुरक्षा पोलिसांनी वेळीच महिलेचे प्राण वाचवले. शिवाय क्रेनच्या साहाय्याने खाडीतून कार बाहेर काढण्यात आली आहे. गुगल मॅप लावून धावत्या वाहनांचे अपघात घडत असल्याचे प्रकार समोर आलेत. तशाच पद्धतीची एक घटना नवी मुंबईतदेखील शुक्रवारी रात्री एक वाजता घडली. एक महिला तिच्या कारने उलव्याच्या दिशेने जात होती. मात्र, बेलापूर येथील खाडीपुलावर जाण्याऐवजी तिने पुलाखालील मार्ग निवडला. गुगल मॅपनुसार तिथे सरळ रस्ता असल्याचे तिला वाटले. मात्र तिची कार थेट ध्रुवतारा जेट्टीवर खाडीत कोसळली. हा प्रकार जवळच असलेल्या सागरी सुरक्षा पोलिसांच्या निदर्शनास आला. सागरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, महिला वाहून जात असल्याचे दिसून आले. त्यांनी त्वरित गस्ती आणि रेस्क्यू बोटीच्या साहाय्याने तिला वाचविण्यात यश मिळिवले.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सहकार क्षेत्राची आढावा बैठक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज खामगाव येथील ब्रिटिशकालीन विश्रामगृहात जिल्ह्यातील शासकीय सहकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाचा तसेच खरीप हंगामातील पीककर्ज वितरणासंबंधी सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस माजी आमदार राणा दिलीप कुमार सानंदा, खामगावचे अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण (सहकारी संस्था, बुलढाणा), जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक खरात, गजानन आमले (सहायक निबंधक, बुलढाणा), महेश कृपलानी (सहायक निबंधक, जळगाव जामोद), गजानन फाटे (सहायक निबंधक, मलकापूर), दाते (सहायक निबंधक, शेगाव), शितोळे मॅडम (सहायक निबंधक, देऊळगाव राजा), अविनाश सांगळे (सहायक निबंधक, मेहकर), विजय ठाकरे (तालुका लेखापरीक्षक, खामगाव), सुभाष हिवरखेडे (लेखा परीक्षक श्रेणी-१), सुभाष सपाटे (उपलेखा परीक्षक, खामगाव) यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मंत्री पाटील यांनी सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता व शेतकऱ्यांपर्यंत लाभ पोहोचवण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसे कर्ज मिळावे, यासाठी यंत्रणांनी समन्वयाने कार्य करण्याचे त्यांनी सांगितले.





## विविध वृत्त...

### अट्टल मोटरसायकल चोरट्याचा कडून ८ मोटरसायकल पोलिसांनी घेतल्या ताब्यात



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यामध्ये चोरीला गेलेल्या मोटरसायकली संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला होता या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांना गोपनीय माहिती मिळाली की, साक्री तालुक्यातील वस्मार या गावात चोरीची मोटरसायकल घेऊन एक तरुण फिरत आहे. त्यांनी तात्काळ आपला शोध पथकाला या तरुणाला ताब्यात घेण्यास सांगितले. यावेळी संबंधित तरुणाला पश्चिम देवपूर पोलिसांनी ताब्यात घेतले असता त्याचे नाव गोलू उर्फ आदिनाथ युवराज बोरसे असल्याचे लक्षात आले. गोलू बोरसे हा अट्टल मोटर सायकल चोर असल्याने पोलिसांनी त्याला व त्याच्या एका साथीदाराला ताब्यात घेत पोलिसी खाक्या दाखवताच त्या दोघांनी तब्बल ३ लाख २० हजार रुपये किंमतीच्या ८ मोटरसायकल पोलिसांच्या स्वाधीन केल्या असल्याची माहिती पोलिसांनी यावेळी दिली.

### उमरखेडमध्ये पर्यावरणासाठी मुलींचा पुढाकार; मुलींनी विविध ठिकाणी मोहीम राबवून झाडे लावली




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन (सीआयओ) ने पर्यावरण रक्षणासाठी एक अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. संस्थेने ''मातीत हात, देशाबरोबर हृदय'' नावाची मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत मुलांनी एका महिन्यात १० लाख झाडे लावली आहेत.

ही मोहीम १ जुलैपासून सुरू झाली. मुले शाळा, मदरसे, मशिदी आणि उद्याने, घरे, मोकळ्या जागी झाडे लावत आहेत. अनेक मुले त्यांच्या घराभोवतीही झाडे लावत आहेत. ही संस्था मुलांना वनस्पतींची काळजी घेण्यास प्रेरित करत आहे. प्रत्येक मूल त्याच्या वनस्पतीचे नाव देत आहे आणि मित्राप्रमाणे त्याची काळजी घेत आहे. सीआयओ ही एक राष्ट्रीय संघटना आहे. ती इस्लामिक मूल्यांवर आधारित आहे. ही संस्था मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करते. निसर्गाची काळजी लहानपणापासूनच शिकवली पाहिजे असे संस्थेचे मत आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास मुले मोठे बदल घडवू शकतात. पृथ्वी सतत गरम होत असल्याने या मोहिमेची आवश्यकता होती. झाडांची संख्या कमी होत आहे. हवेची गुणवत्ता खालावत आहे. जंगले नष्ट होत आहेत. यामुळे हवामान बदलाचा धोका वाढत आहे. सीआयओचा असा विश्वास आहे की मुले ही परिस्थिती बदलू शकतात. झाडे लावून ते केवळ पृथ्वीला मदत करणार नाहीत तर त्यांचे भविष्य देखील सुरक्षित करतील.

### सांगली जिल्ह्यात पावसाची संततधार; चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी, कोयना धरणातून १८६६५ क्युसेक विसर्ग

**सांगली/प्रतिनिधी :** सांगली जिल्ह्यात रात्रीपासून संततधार पाऊस सुरू आहे. आज (२६ जुलै) सकाळी देखील संततधार पावसाचा जोर कायम आहे. चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये रात्रीपासून अतिवृष्टी होत असून चांदोली धरणाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. यामुळे चांदोली धरणातून वारणा नदीत सोडण्यात येणारा विसर्ग वाढवत तो १०२६० क्युसेक विसर्ग करण्यात आला आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला आहे. जलाशय परिचलन सूचीप्रमाणे धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी वक्रद्वाराद्वारे ८६३० क्युसेक्स व विद्युतगृहातून चालू असणारा १६३० क्युसेक असा एकूण १०२६० क्युसेक विसर्ग वारणा नदीपात्रात सोडण्यात आला आहे.

# सततच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे पीके धोक्यात भुमराळयात अतिवृष्टी : शेतकरी वर्ग हतबल

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप


**लोणार :** यावर्षी वरूणराजा शेतकऱ्यांवर कोपल्याने शेतकरी वर्ग पुरता उद्ध्वस्त झाला आहे. मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसाने संत्रा, आंबा आणि बागायती पिकांचे प्रचंड नुकसान केले. त्यानंतर जून महिन्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या अतिवष्टीने शेतकऱ्यांना मातीत घालण्याचे काम केले आहे. परिसरातील हजारो हेक्टर जमिन खरडून गेली आहे. तर, हजारो हेक्टरवरील पेरणी केलेले बियाणे व खत वाहून गेले आहे. आता गत पाच ते सहा दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असल्याने शेतकरी वर्ग उद्धवस्त झाला आहे. संततधार पावसान पिके धोक्यात आली आहेत. तर परिरसरात हजारो हेक्टर जमिन पेरणीविना राहिली आहे. भुमराळयात अतिवृष्टी झाल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. बिबी मंडळात गेल्या पाच दिवसांपासून रात्रंदिवस अति मुसळधार पाऊस पडत असल्याने शेतकरी मात्र हैराण झाले आहेत.लोणार तालुक्यातील बिबी मंडळातील भुमराळा, वझरआघाव, सावरगाव तेली, बिबखेड, किनगाव जटटू, खंडाळा, बिबी,माडवा, चोरपांग्रा, पिंपरी खंदारे, चिखला, यासह अनेक गावांना मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. छोटे मोठे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. सतत च्या मुसळधार पावसामुळे भुमराळा, वझरआघाव, सावरगाव तेली, बिबखेड खंडाळा सह मंडळातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या आहेत तर पाच दिवसापासून शेतातील पिके पाण्याखाली गेली असून सोयाबीन कपाशी सह अन्य पिकांच्या मुळ्या सडायला सुरुवात झाली असून पिके पिवळी पडत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून सरसकट ओला दुष्काळ जाहीर करुन त्याची तात्काळ नुकसान




भरपाई करुन संपूर्ण शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे.अनेक ठिकाणी विहीर खचल्या तर भुमराळा येथे सिताफळ, संत्रा बागेला मुसळधार पावसाचा फटका बसला असून फळ पिकाचे स्वतंत्र पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी देखील त्याच्या शेतकऱ्यांनी केली आहे.

## मुसळधार पावसामुळे गोंदिया शहर जलमय

### भाजप आमदार विनोद अग्रवाल यांनी गुडघाभर पाण्यातून केली शहरातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी





दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.गोंदिया शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरल आहे याच नुकसानग्रस्त भागाची पाहणी करिता भाजपचे आमदार विनोद अग्रवाल हे गेले होते. या दरम्यान आमदार विनोद अग्रवाल यांनी स्वतः गुडघाभर पाण्यातून प्रवास करत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या तर नागरिकांना नुकसान



भरपाई मिळवून देण्याचे आश्वासन यावेळी आमदार विनोद अग्रवाल यांनी दिले.

## तरुणांच्या सतर्कतेमुळे शेतकरी महिलेचा जीव वाचला

### तालुक्यातील सावरगाव तेली येथील घटना : दोन युवक ठरले महिलेसाठी देवदूत दैनिक

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** शेत काम करून घरी येत असताना सावरगाव तेली गावाजवळील पुलावरील पुराच्या पाण्यातील अंदाज न आल्याने व अचानक पाणी वाढल्याने महिला पुराच्या पाण्यात वाहून जात होती. हा प्रकार बाजूलाच असलेल्या युवकांच्या लक्षात येताच त्यांनी जीवाची परवा न करता पुराच्या पाण्यात उडी मारून सदर महिलेला पुराच्या पाण्यातून बाहेर काढून महिलेचा जीव वाचविला.

संततधार पाऊस सुरू असल्याने व २६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे परिसरातील नदी-नाल्यांना महापूर आला आहे. लोणार तालुक्यातील सावरगाव तेली येथील शेतकरी महिला यशोदा उकाजी चव्हाण या शेतातून घरी येत असताना सावरगाव तेली व तांडा (बंजारा वस्ती) च्या मध्ये असलेल्या पुलावरून त्या जात असताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढल्याने त्यांचा तोल गेला व त्या पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून जात होत्या. परंतु, त्या ठिकाणी उपस्थित गावातील तरूण निलेश गाडेकर, उमेश सौदर व उमेश लांडगे यांनी क्षणाचाही विलंब न करता पाण्यामध्ये उड्या घेऊन आपला स्वतःचा जीव धोक्यात घालून शेतकरी महिलेचे प्राण वाचविले.



त्यामुळे जीवितहानी टळली. या भयावह घटनेनंतर गेल्या कित्येक वर्षांपासून गावकरी करत असलेल्या पुलाची उंची वाढवण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. लोकप्रतिनिधींनी व सरकारने आता तरी लक्ष घालून पुलाची उंची वाढ होण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा आंदोलन करण्यात येईल. असा इशारा गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

## प्राचार्य डॉक्टर जे बी देवडे यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विभागीय सल्लागार पदी नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** ता.२६ जीवन विकास शिक्षण संस्था रिसोडचे कार्यकारी अधिकारी (उच्च शिक्षण ) तथा स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ जे बी देव्हडे यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकच्या अमरावती विभागीय केंद्र सल्लागार समितीच्या वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून मा कुलगुरू यांचे मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे. मुक्त विद्यापीठाच्या विभागीय कार्यपद्धतीत अधिक सुधारणा होणे यासाठी विभागीय केंद्राच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्याचे प्रत्येकी एक सदस्य या समितीत समाविष्ट करण्यात आले आहेत. NAAC च्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती विभागीय केंद्राचे कामकाज अधिकाधिक कार्यक्षम होण्यासाठी कार्य आढावा तयार करून विभागीय केंद्राच्या कार्यपढतीत अपेक्षित बदल व सुधारणा तथा मार्गदर्शन करेल. प्राचार्य डॉ देव्हडे यांचे नियुक्तीने शैक्षणिक क्षेत्रात



आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या नियुती बद्दल जीवन विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबाराव पाटील, सचिव अमित पाटील तसेच शैक्षणिक वर्तुळातून अभिनंदन होत आहे.

## वर्ग दोन जमिनीची वर्ग एक मध्ये रूपांतर करणारी गँग सक्रिय – इम्तियाज जलील



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शहर व जिल्ह्यात मागील सहा वर्षात वर्ग दोन जमिनीचे वर्ग एक मध्ये बेकायदा रूपांतर करण्यात आले आहे. या प्रकरणात संगनमताने कोट्यावधींचा भ्रष्टाचार करणारे भूमाफिया दलाल आणि संबंधित महसूल अधिकारी यांची उच्चस्तरीय चौकशी करावी, दोषींवर फौजदारी कारवाई करावी, जमिनीची तपासणी करून ती मूळ स्थिती पून: वर्गीकरणाची मागणी माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केली.

नांद्राबाद मधील गट क्रमांक २३ मधील जमिनीसह २०१९ पासून आज पर्यंत वर्ग एक जमिनीची वर्ग दोन मध्ये बेकायदार रूपांतर करण्याची संपूर्ण चौकशी करण्यासाठी स्वतंत्र उच्चस्तरीय समितीची स्थापना करावी, याबाबतचे पत्र मुख्यमंत्री मुख्य सचिव विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना पाठवले आहे. ही टोळी सरकारी चलनाचा वापर करून वर्ग दोनच्या जमिनी स्वस्त दरात खरेदी करते, त्यानंतर जमीन खाजगी कंपन्यांना आणि बिल्डरांना जास्त दराने विकली जाते. हे सर्व जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने होत आहे, असे इम्तियाज जलील म्हणाले आहेत.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जगदंबा देवी मंदिरात महाआरती रक्तदान शिबिरासह विविध उपक्रम : शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने आयोजन








दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त बुलढाणा जिल्हा शिवसेनेच्या वतीने विविध कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच उद्धव ठाकरे यांना उदंड व निरोगी आयुष्यासाठी बुलढाण्याचे ग्राम दैवत असलेल्या जगदंबा देवीला पातळ चढवून महाआरती करण्यात आली.

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने ग्राम दैवत असलेल्या जगदंबा देवीला पातळ चढवून महाआरती करण्यात आली. शेतकऱ्यांना मोफत वृक्ष वाटप, ग्रामीण भागात वृक्षारोपण,जिल्हा परिषद शाळेतील ५ हजार विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. सामान्य रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप , मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. त्यानंतर बुलढाणा येथील गर्दे वाचनाच्या सभागृहात रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि कार्यकर्त्यांसोबत संवाद मेळावा देखील घेण्यात आला. शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे हे पक्षाचे प्रमुख नाहीतर संपूर्ण महाराष्ट्राचे कुटुंब प्रमुख म्हणून त्यांनी कोरोना काळात काम केले. संपूर्ण राज्यांनी देशांनी पाहिले. दरवर्षी शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वेगवेगळ्या माध्यमातून वाढदिवस साजरा करत असतो. वृक्षारोपण विद्यार्थ्यांना खाऊ वाटप गुणवंत विद्यार्थ्यांना कौतुकाची स्थाप रक्तदान शिबिर घेत साजरा केला. अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी दिली आहे. यावेळी प्रवक्ता जयश्रीताई शेळके, महिला आघाडी जिल्हा प्रमुख सौ. चंदाताई बढे ,सहसंपर्क प्रमुख छगनदादा मेहेत्रे, डी. एस. लहाने, जिल्हा समन्वयक संदीप शेळके, युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, उपजिल्हा प्रमुख लखन गाडेकर यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.